आदेश

जा.क्र. २२५६/कोरोना/मनाई/आदेश/२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
दिनांक. ३१/०३/२०२०

**विषय :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ४३ (१) अन्वये सर्व धार्मिक प्रार्थनास्थळे बंद ठेवणे बाबतच्या आदेशाचा कालावधी वाढविणेबाबतचा आदेश.**

(२) ज्याअर्थी, कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पुणे शहरात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. या पार्श्वभुमीवर पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, यांचेकडील जा क्र १९९८/कोरोना/मनाई/आदेश/२०२० दि.२२/०३/२०२० अन्वये पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश अंमलात आहे.

(३) कोरोना विषाणुंचा प्रसार रोखण्यासाठीच्या उपाययोजनांचा भाग म्हणुन केंद्र सरकारच्या निर्देशानुसार (संदर्भ- क्र गृहमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील क्र.४०-३/२०२० DM-१ (A) अन्वये) संपुर्ण भारतात १४ एप्रिल २०२० पर्यत लॉकडाऊन करण्याची अधिसुचना दि.२५ मार्च २०२० पासुन केंद्र शासनामार्फत जारी करण्यात आली आहे.

(४) त्याशिवाय राज्य सरकार यांच्या मंत्रालयाने महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. DMU/2020/CR.92/DisM -1 DT.२३/०३/२०२० आपत्ती व पुनर्वसन व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई मधील मुद्दा क्र. ११ अन्वये जाहीर केलेप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, तसेच सर्व धर्मियांच्या प्रार्थनास्थळी जनसमुदाय जमण्याचा संभव लक्षात घेवुन त्याठिकाणी कोरोना विषाणु साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याचा संभव आहे. तेव्हा त्यासाठीचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होवु नये म्हणुन त्यासाठी आवश्यक वाटतील असे आदेश तात्काळ करणे आवश्यक आहे. यासाठीच्या उपाययोजनेकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ४३ (१) अन्वये नमुद केलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने सर्व धर्मियांच्या जनतेस त्यांच्या कोणत्याही ठिकाणच्या प्रार्थनास्थळावर समुदायाने न जमण्याच्या उद्देशाने मनाई आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

(५) त्याअर्थी मी, डॉ. रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ४३ (१) अन्वये कोणत्याही धर्माच्या व्यक्तीला पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणच्या प्रार्थनास्थळावर समुदायाने न जमण्यासाठी सर्व धर्माची प्रार्थनास्थळे नागरिक, भाविक, शिष्य, समर्थक या सर्वांसाठी दि.२३/०३/२०२० चे २१.०० ते दि. ३१/०३/२०२० चे २४.०० वा. चे दरम्यान बंद राहण्याबाबतचे आदेश दिलेले होते. सदर आदेशास केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या उपरोक्त आदेशांन्वये मुदतवाढ देवुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ४३ (१) अन्वये तो दि.१४/०४/२०२० चे २४.०० वा. पर्यत लागू करण्यात येत आहे.

(६) मात्र सदर प्रार्थनास्थळातील दैनंदिन तसेच पारंपारिक पुजाविधी करण्यासाठी संबंधित प्रार्थनास्थळाच्या व्यवस्थापनाने निर्देशित केलेले पुजारी/धर्मगुरु यांना परवानगी राहील. त्यांची नावे स्थानिक पोलीस स्टेशनला कळविण्यात यावी.

(७) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि. ३१/०३/२०२० रोजी दिलेला आहे.

**(डॉ. रवींद्र शिसवे)**
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- ३१/०३/२०२०**